00512

# मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

## सत्रांत परीक्षा

## जून, 2011

## पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01

*समय : 2 घण्टे* *अधिकतम अंक : 50*

1. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : 10

   (a) दूरदर्शन वरील जाहिराती

   (b) साहित्याचे जीवनातील स्थान

   (c) माझा आवडता सण

   (d) पर्यावरणाचे महत्त्व

2. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : 8

   (a) तुकारामांनी आपली विठ्ठलावरील अनन्यभक्ती कोणकोणत्या दृष्टान्तांद्वारे सांगितली ते स्पष्ट करा.

   (b) केशवसुतांनी 'आम्ही कोण' या कवितेत कवीची दृष्टी वेगळी असते असे का म्हटले आहे ?

   (c) 'कातरवेळ' या कथेत अक्काच्या माहेरी झालेल्या आगमनाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?

   (d) 'वळीव' या कथेत लेखकाने वादळाचे वर्णन कशा प्रकारे केले आहे ?

3. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(a) चेलम्याचे पाणी प्यायल्यामुळे लेखकावर कोणता प्रसंग ओढवला ?

(b) आकाशाला लेखकाने 'अलौकिक मौनिबाबा' असे का म्हटले आहे ?

(c) कुंजा सांबर का मारीत नाही ?

(d) 'गुंड्या भाऊचे दुखणे' या कथेत डॉक्टरांची सामूहिक ठकबाजी कशी सांगितली आहे ?

4. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** विषयांवर टीपा लिहा : 6

(a) 'ऐतिहासिक सत्य' आणि 'साहित्यातील सत्य'.

(b) बालगंधर्वांच्या गायकीची वैशिष्टये.

(c) बातम्यांचे महत्त्व.

(d) जाहिरात-लेखना साठी आवश्यक गुण.

5. (a) नामाचे प्रकार कोणते ते सोदाहरण सांगा. 2

(b) पुढील शब्दांचे अर्थ सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करा. 3

(i) वानणे (ii) गतप्रभ (iii) भस्मसात

6. खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : 3

(a) पिंगा घालणे.

(b) तोंड भरून स्तुती करणे.

(c) भेलकांडू लागणे.

(d) तोंडचे पाणी पळणे.

(e) पावले जड होणे.

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(a) संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी.

(b) चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे.

(c) उद्योगाचे घरी ऋद्धीसिद्धी पाणी भरी.

(d) गाढवाला गुळाची चव काय ?

(e) पडत्या फळाची आज्ञा.

7. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर लिहा : 4

(a) स्त्री–मुक्ती चळवळीची गरज का आहे ?

(b) कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य कोणते ?

(c) डॉ. आंबेडकरांनी लोकशाहीच्या रक्षणासाठी आपल्यावर कोणत्या जबाबदाऱ्या आहेत असे सांगितले ?

(d) विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कोणते इष्ट व अनिष्ट परिणाम झाले ?

8. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 4

The pilot had now cut both engines, and was bringing the plane down in a circling movement. But he could not control the speed, and it was tilting heavily to one side. Instead of landing smoothly on its belly, it came down on a wing tip, and this caused the plane to swivel

violently around in the choppy sea. There was a terrific jolt when the plane hit the water, and if it had not been for the seat belts, we would have been flung from our seats. Even so, Mr. Muggeridge struck his head against the seat in front, and was now holding a bleeding nose and using some shocking language.

9. खालील उत्ताऱ्याचा सारांश लिहा : 4

बुद्धिभ्रम करुन जो सामान्य माणसांना चुकीच्या रस्त्याने नेतो त्याला बुद्धिमान म्हणता येणार नाही. जो मनुष्यमात्राच्या कल्याणाची कल्पना सांगतो, श्रद्धा वाढवतो, तो बुद्धिमान होय. लोकांच्या ज्ञानाच्या मार्गात जो अडथळा उत्पन्न करील व अश्रद्धा वाढवील त्याला बुद्धिमान म्हणता येणार नाही. बुद्धी म्हणजे श्रद्धा आणि श्रद्धा म्हणजे भगवंत. श्रद्धाहीन माणूस पैसे कमावेलही, पण त्याला त्याने समाधान मिळणार नाही.

बुद्धी म्हणजे सारासार निर्णय घेण्याची शक्ती. स्मृती, मेधा, बुद्धी, प्रज्ञा हे आयुर्वेदातही येतात. स्मृती चांगली असण्यासाठी ऐकण्याची इच्छा पाहिजे. ऐकण्याची इच्छा नसेल तर ऐकू येत नाही. कारण त्याकडे लक्षच नसतं. श्रवण केलेलं नीट ग्रहण केलं पाहिजे आणि मग ते धारण केलं पाहिजे. त्यानंतर त्यावर सारासार विवेक करण्यासाठी चिंतन, मनन करावे लागते. त्यातून योग्य अर्थ प्रगट झाला तर त्याचं ज्ञान होणार.